**<u>निशाणी क्र.२१ खालील आदेश</u>**

१. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा त्यांची कैफियत दाखल करण्यात झालेला विलंब माफ होवुन मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचे कथन की, वादी यांनी प्रस्तुत दावा जाहीरनामा आणि निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी हजर झाले परंतु प्रतिवादी क्र.१ यांना दमा, बी.पी व हृदय विकाराचा त्रास असल्याने त्यांना नियमित औषधोपचार, चाचण्या करण्यासाठी वारंवार शहरात मोठ्या दवाखान्यात जावे लागते. प्रतिवादी क्र.१ हे आजारी असल्यामुळे त्यांना कागदपत्र जमविण्याकरिता बाहेर जाणे शक्य होत नव्हते व त्यामुळे ते त्यांच्या वकिलांना दाव्यासंदर्भातील माहिती देवु शकले नाही. त्यामुळे त्यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला आहे. तरी आजरोजी प्रतिवादी हे प्रस्तुत दाव्यात त्यांची कैफियत दाखल करण्यास तयार आहे. त्यामुळे कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे. सदरचा विलंब माफ न केल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करावी अशी विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले तसेच प्रतिवादी यांच्या अर्जातील संपुर्ण मजकुर नाकारला. वादी यांचे कथन की, प्रतिवादी यांनी

मुद्दामहुन त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. तसेच त्यांनी जबाब देण्यास का विलंब झाला याचे कारण नमुद केलेले नाही. करिता प्रतिवादी यांचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादींच्या वकिलांचे म्हणणे ऐकले. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुत दावा जाहिरनामा व निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये त्यांचे म्हणणे सादर करण्याची तसेच झालेला विलंब माफ होवुन मिळावा ही विनंती केली आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणण्याच्या पुष्ठ्यार्थ स्वत: चे प्रतिज्ञापत्र दिलेले आहे. परंतु त्यांचे म्हणणे सिध्द करण्यासाठी त्यांनी कुठलाही पुरावा किंवा दस्त अभिलेखावर दाखल केला नाही. सदर प्रकरण गुणवत्तेवर चालविण्याकरिता प्रत्येक पक्षकाराला समान संधी मिळणे कायद्याने गरजेचे आहे. तसेच आजरोजी ते त्यांची कैफियत दाखल करण्यास तयार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना त्यांचे म्हणणे/कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ केल्यास कोणत्याही पक्षाचे नुकसान होणार नाही. उलट न्यायदान करण्यास मदत होईल. करिता प्रकरणाचे स्वरुप बघता व स्थिती बघता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :—

## **<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी यांचा प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

PRIYANKA HARISH AHIRE

Digitally signed by PRIYANKA HARISH AHIRE
Date: 2025.04.09 12:21:37 +0530

दिनांक :—०८/०४/२०२५

(पी. एच. अहिरे)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
सटाणा.

**CERTIFICATE**

I certify that the contents of this PDF File are word to word as per Original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Akash P. Sonawane |
| Name of the Court | : | 2nd Jt. Civil Court (J.D.), Satana. |
| Date of Decision | : | 08.04.2025. |
| PDF Uploading Date | : | 08.04.2025 |

*Sd/-*
Stenographer